**ठळक बातम्या**

- देशभरात आजपासून घरोघरी तिरंगा अभियान सुरू

- ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली

- परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आजपासून ३ दिवसांच्या मालदीव दौऱ्यावर

- राष्ट्रीय शेअर बाजाराच्या विशिष्ट नोंदणीकृत गुंतवणूकदारांच्या संख्येनं पहिल्यांदाच ओलांडला १० कोटींचा टप्पा

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमधल्या कामगिरीसाठी हॉकी संघ आणि भालाफेकपटू नीरज चोप्रावर अभिनंदनाचा वर्षाव

**<><><><><>**

आगामी स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर, नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी आज ऑगस्ट क्रांती दिन ते १५ ऑगस्ट अर्थात स्वातंत्र्य दिनापर्यंत देशभरात हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियान राबवण्यात येणार आहे.

या मोहीमेला पुन्हा एकदा लोकचळवळ बनवण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशाद्वारे केलं आहे. तिरंग्याच्या सन्मानासाठी नागरिकांनी आपल्या घरावर फडकवलेल्या तिरंग्याचा फोटो हर घर तिरंगा

संकेतस्थळावर टाकावा असं आवाहनही त्यांनी केलं आहे. तसंच स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या समाजमाध्यम हँडलवर तिरंग्याचं चित्र लावलं.

दरम्यान, या काळात नागरिकांनी आपल्या घरावर डौलाने तिरंगा फडकवावा आणि त्याबरोबर सेल्फी घेऊन तो फोटो हर घर तिरंगा या संकेतस्थळावर अपलोड करावा, असं आवाहन केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. या अभियानाची माहिती देताना शेखावत म्हणाले की, २०२२ साली स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त या अभियानाची सुरुवात झाली, त्याला नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. मागच्या वर्षी १० कोटीपेक्षा जास्त नागरिकांनी तिरंग्या बरोबरचा आपला फोटो संकेतस्थळावर पाठवला होता. यावर्षी या अभियाना दरम्यान देशभरात सुमारे दोनशे सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून, येत्या १३ ऑगस्ट रोजी दिल्लीत खासदार आणि केंद्रीय मंत्र्यांचा सहभाग असलेली तिरंगा बाईक रॅली काढण्यात येणार आहे, असही शेखावत यांनी सांगितलं.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा हे अभियान, स्वातंत्र्यसैनिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या त्याग आणि बलिदानाची जाणीव करून देईल. या अभियानाने लोक चळवळीचं स्वरुप धारण केलं असून यावर्षी राज्यातल्या अडीच कोटी घरांवर तिरंगा फडकावला जाणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून घरोघरी तिरंगा अभियानाला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते. या अभियानात जनतेनं मोठ्या संख्येनं सहभागी व्हावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या भारत छोडो आंदोलनात भाग घेतलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहिली. हा स्वातंत्रलढ्याच्या चळवळीला कलाटणी देणारा महत्वपूर्ण दिवस, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. देश भ्रष्टाचार, घराणेशाही आणि तुष्टीकरण यापासून मुक्त असावा ही भावना या चळवळीच्या माध्यमातून दृढ झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आपल्या दोन दिवसीय न्यूझीलंड दौऱ्यात आज ऑकलंड इथं आयोजित एका नागरी स्वागत समारंभात तिथल्या भारतीय समुदायाशी आणि भारताच्या मित्र परिवाराशी संवाद साधणार आहेत. न्यू झीलंडमध्ये ३ लाखाहून अधिक भारतीय राहतात. दरम्यान, न्यू झीलंड बरोबरचे राजनैतिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी भारत ऑकलंडमध्ये वाणिज्य दूतावास उघडणार असल्याचं राष्ट्रपतींनी काल त्यांच्या सन्मानार्थ आयोजित मेजवानीवेळी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आज मालदीवच्या ३ दिवसीय दौऱ्यावर जाणार आहेत. दोन्ही देशांमधले परस्पर संबंध आणखी दृढ करण्याच्या नव्या संधी शोधणं हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे. हिंद महासागर क्षेत्रात महत्वपूर्ण सामरिक भौगोलिक स्थान असलेला मालदीव हा भारताचा प्रमुख शेजारी देश आहे.

**<><><><><>**

रशियन सैन्यात आतापर्यंत ९१ भारतीय नागरिक भरती झाल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी आज लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. यापैकी ८ जणांचा मृत्यू झाला असून १४ जणांना सेवामुक्त करण्यात

आल्याचं तर ६९ भारतीय सेवामुक्ती मिळण्याच्या प्रतीक्षेत आहेत, असंही त्यांनी सांगितलं. यासंदर्भात आपण रशियाच्या परराष्ट्र मंत्र्यांशी अनेक वेळा चर्चा केल्याचं ते म्हणाले. रशियन सैन्यात असलेल्या भारतीयांना लवकरच सेवामुक्त केलं जाईल असं आश्वासन रशियाच्या राष्ट्राध्यक्षांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना त्यांच्या रशिया दौऱ्यादरम्यान दिल्याचं त्यांनी सदनात सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय शेअर बाजाराच्या विशिष्ट नोंदणीकृत गुंतवणूकदारांच्या संख्येनं पहिल्यांदाच १० कोटींचा टप्पा पार केला आहे. मार्च २०२१ मध्ये नोंदणीकृत गुंतवणूकदारांची संख्या ४ कोटीवर पोहोचली होती. हा आकडा गाठण्यासाठी २५ वर्षांचा काळ लागला होता. मात्र, त्यानंतर सुमारे ६ ते ७ महिन्यात पुढचे १ कोटी नोंदणीकृत गुंतवणूकदार जोडले गेले होते. तर, केवळ ५ महिन्यात गुंतवणूकदारांची संख्या ९ कोटीवरून १० कोटीवर पोहोचल्याचं, एन एस ई नं एका प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. डिजिटायझेशन, आर्थिक समावेशन आणि गुंतवणूकदारांची जागरूकता यामुळे ही संख्या झपाट्यानं वाढत आहे, असंही या पत्रकात म्हटलं आहे. या १० कोटी गुंतवणूकदारापैकी बहुसंख्य गुंतवणूकदार महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातले आहेत.

**<><><><><>**

भारताच्या परकीय चलन भांडारात जुलै २०२४ च्या शेवटच्या हप्त्यात ४ अब्ज डॉलरपेक्षा जास्त वाढ नोंदवली गेली आहे. देशाच्या परकीय चलन भांडारात सध्या ६७० अब्ज डॉलरपेक्षा जास्त रक्कम जमा झाली आहे. परकीय चलन भांडाराचा हा आतापर्यंतचा सर्वात विक्रमी स्तर असल्याचं रिझर्व्ह बँकेच्या अहवालात म्हटलं आहे. दरम्यान, मागच्या सप्ताहात देशाच्या सोन्याच्या साठ्यातही वाढ झाली असून यात १ अब्ज डॉलरपेक्षा जास्त वाढ झाली आहे.

**<><><><><>**

कमी वजनाच्या वाहनांच्या उत्पादनात ४ पूर्णांक ६ दशांश या वार्षिक दरानं भारत २०२३ ते २०३३ या काळात जगाचं नेतृत्व करेल, असा अंदाज एस अँड पी ग्लोबल मोबिलिटी या वाहन क्षेत्राच्या डेटाचे विश्लेषण करणाऱ्या कंपनीनं वर्तवला आहे. हलक्या वाहनांच्या विक्रीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे नेते मनीष सिसोदिया यांना सर्वोच्च न्यायालयाने कथित अबकारी धोरणातल्या अनियमितता प्रकरणी जामीन मंजूर केला आहे. सिसोदिया सतरा महिन्यांपासून कोठडीत होते, मात्र त्यांच्यावर अजूनही खटला सुरू झाला नाही. त्यामुळे जलद सुनावणी करण्याच्या त्यांच्या अधिकाराचं हनन होत असल्याचं सांगत न्यायालयाने सिसोदिया यांना ईडी आणि सीबीआय या दोन्ही खटल्याप्रकरणी जामीन मंजूर केला.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकच्या कालच्या दिवशी भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्रा यानं रौप्यपदकावर नाव कोरलं, तर पुरुष हॉकी संघानं कांस्यपदकाला गवसणी घातली. या कामगिरीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नीरज चोप्राचं कौतुक केलं आहे. संपूर्ण देशाला नीरजचा अभिमान आहे आणि त्याच्या कामगिरीमुळे येणाऱ्या कित्येक पिढ्यांना प्रेरणा मिळेल, अशा शब्दांत राष्ट्रपतींनी त्याची प्रशंसा केली. नीरजनं नेहमीच त्याची प्रतिभा दाखवून दिली आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. त्याच्या कामगिरीमुळे तिरंगा ध्वजाचा मान वाढल्याची प्रतिक्रिया गृहमंत्री अमित शाह यांनी दिली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कास्यपदक विजेत्या हॉकी संघाचंही अभिनंदन केलं. भारतीय हॉकीला पुनरुज्जीवित केल्याचं मोठं श्रेय या संघाला जातं, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही संघाचं अभिनंदन केलं. जागतिक मंचावर त्यांनी भारताचं नाव उंचावल्याचं ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल संघातल्या हॉकीपटूंशी फोनवरून संवाद साधला आणि त्यांचं अभिनंदन केलं. या संघाच्या सन्मानार्थ प्रत्येक हॉकीपटूला प्रत्येकी १५ लाख रुपये आणि त्यांच्यासोबतच्या चमूला प्रत्येकी साडेसात लाख रुपये देण्याची घोषणा हॉकी इंडियानं केली आहे.

**<><><><><>**

दरम्यान, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आजच्या दिवशी कुस्ती, ॲथलेटिक्स आणि गोल्फ स्पर्धेत भारताचे खेळाडू मैदानात उतरतील.

**<><><><><>**

ईशान्य भारतात तसंच पश्चिम हिमालयीन भागात येत्या आठवड्यात मुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. पुढच्या चारपाच दिवसात भारताच्या पूर्व भागातही जोरदार ते अतीजोरदार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

**<><><><><>**

बांगलादेशातल्या हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ महंमद युनूस यांनी काल शपथ घेतली. बांगलादेशाचे राष्ट्रपती महंमद शाहबुद्दीन यांनी त्यांना ढाका इथल्या वंग भवन इथं पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी विविध देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**//<><><><><>//**